

फैज़ अहमद फैज़





रुमाना हुसैन

फैझ अहमद फैझ





मराठी अनुवादः सुशील मेन्सन



याचं नाव *फैझ* ठेवूया का?
खरंच, छान नाव आहे. मग त्याचं पूर्ण नाव *फैझ मोहम्मद बहादूर सुलतान मोहम्मद खान* होईल. प्रभावी वाटतं हे नाव!



छोट्या फैझला कोण शिकवतंय?
आमच्या शेजारच्या मस्जिदमधले मौलवी *मोहम्मद इब्राहीम* त्याला कुराण शिकवतात. तो थोडा मोठा झाला की तुमचे शिक्षक *मीर मोहम्मद* यांनी त्याला अरबी आणि फारसी शिकवावं, असं मला वाटतं. तुम्हाला काय वाटतं, *इक्बाल*?
का नाही? ते खूप विद्वान आहेत. माझ्या मते तुम्ही फैझला इंग्रजी शिकण्यासाठी *स्कॉच मिशन हायस्कूल*मध्ये भरती करावं. तुम्हाला काय वाटतं?
अगदी बरोबर बोलतात तुम्ही. इंग्रजी शिकण्यासाठी ती *सियालकोट*मधील सर्वात चांगली शाळा आहे.



محمد



ज्याने गृहपाठ केला नाही, त्याला आज शिक्षा करणार मी. जरा फैझकडे बघा. तो तुमचा वर्गमित्र आहे. बघा, किती मेहनत करतो तो! किती शालीन आहे! म्हणूनच, त्याला दरवर्षी मी मॉनिटर बनवतो.



फैझ, मला पत्र लिहून दिल्याबद्दल तुझे आभार. दे, मी त्यावर सही करतो. तू मला इंग्रजी वृत्तपत्रातल्या बातम्यांचा मजकूर वाचून दाखवत जा. देव तुझं भलं करो.
1924





एकदा फैझच्या वडिलांचे हिशेबनीस त्याच्यावर रागावले. ते म्हणाले, “तुझ्या वडिलांकडे तक्रार करायला हवी. तू शाळेची पुस्तकं वाचण्याऐवजी फालतू कादंबऱ्या वाचतोस.” वडिलांनी बोलावले तेव्हा फैझ थोडा घाबरला.
मला *अब्दुल हलीम शरार* यांची एखादी कादंबरी द्या. मी पुढच्या आठवड्यात परत करेन.
फैझ, तू नेलेली पुस्तकं नेहमी वेळेत परत करतोस. हे घे पुस्तक. याचे दोन पैसे होतील.


तुफैल आणि *इनायत* यांना वाचनापेक्षा खेळायला जास्त आवडतं. पण तुला मात्र कादंबऱ्या वाचायला आवडतं, असं ऐकलंय मी. तू उर्दू कादंबऱ्यांऐवजी इंग्रजी कादंबऱ्या का नाही वाचत? फोर्टमधल्या ग्रंथालयात मिळतात त्या.
फैझ इंग्रजी कादंबऱ्या वाचू लागला. त्याने *डिकन्स, हार्डी* आणि इतर अनेक इंग्रजी लेखकांची पुस्तके वाचली. त्यातील अर्धिअधिक तर त्याच्या डोक्यावरून जात असत. पण या वाचनामुळे त्याची इंग्रजी भाषा सुधारली. त्याच्या घराशेजारी एक जुना वाडा होता. त्याकाळी तिथे मुशायरा भरत असे. दहावीत असताना फैझने कविता लिहायला सुरुवात केली.



फैझ स्कॉच मिशन शाळेतून *मॅट्रीक* उत्तीर्ण झाला. मग तो सियालकोटच्या *मर्रे* कॉलेजमधून *इंटरमिजिएट* झाला..
फैझ, काल कॉलेजमधल्या मुशायरात तुझे शेर लाजवाब होते. मला विचारशील तर तू शायरीवर आणखी मेहनत घे. भविष्यात तू एक उमदा शायर म्हणून ओळखला जाशील.
मला प्रोत्साहन दिल्याबद्दल तुमचे खूप आभार, प्रोफेसर *चिश्ती.* खरंतर मी शायरीकडे फारसे लक्ष देत नाहीये. माझे दहावीचे शिक्षक, *मुन्शी सिराजुद्दीन,* मला, प्रथम अभ्यासाकडे लक्ष दे, शायरी करण्यात वेळ वाया घालवणं बरं नाही, असं सांगतात.
अजिबात नाही. काल तुला टाळ्या मिळाल्या, त्याने हेच सिद्ध होतं की तुझी शायरी दर्जेदार आणि लोकप्रिय आहे.


सियालकोटच्या मर्रे कॉलेजमधून फैझ लाहोरच्या गव्हर्नमेंट कॉलेजला गेला. तिथे त्याला खूप चांगले शिक्षक मिळाले. *पत्रस बुखारी* आणि *सुफी तबस्सुम* हे त्यांपैकीच. तिथे त्याचा परिचय *चिराग हसन हसरत, इम्तियाझ अली ताज, हफीझ जालंधरी आणि अख्तर शिरानी* अशा प्रसिद्ध लेखकांशी झाला.
फैझ, पुढे काय करायचा विचार आहे?
आता तर फक्त बी.ए. ची पदवी मिळालीय. मला अरबी आणि इंग्रजी साहित्यात मास्टर्स करायचंय.


इंग्रज लोक किती महान आहेत! म्हणूनच, ब्रिटिश साम्राज्यावर सूर्य कधीच मावळत नाही. किती उदात्त आहेत आपले राज्यकर्ते!
भारत हा ब्रिटिश राज्याच्या मुकुटातला सर्वात मौल्यवान हिरा आहे, हे खरं, पण फक्त काही धनिकांसाठी. गरीबांकडे बघा, त्यांच्याकडे ना राहायला घर, ना खायला अन्न, ना अंगावर घालायला कपडे आहेत.
फैझ या गोष्टांवर विचार करून तू नेहमी दु:खी होतोस. काय झालं? सकाळीसकाळीच तू इतका उदास का दिसतोयस?
मला घरची आठवण येतेय. मला माझे आईवडील, माझं घर आणि माझ्या शहरातील गल्लीबोळ बघावेसे वाटतायत.
तू सगळ्यांसारखं दिवाळीच्या सुट्टीत घरी जाऊ शकतोस.



यादरम्यान, फैझच्या वडिलांचे निधन झाले आणि त्याच्या कुटुंबाला गरीबीला तोंड द्यावे लागले. काही वेळा त्यांच्या घरात खायला अन्नाचा दाणा नसे. वैयक्तिक अडचणींशिवाय, फैझने आजुबाजूला गरीबांना सहन करावा लागणारा जाच आणि त्यांच्यावर होणारे अन्यायही बघितले.
आणखी किती काळ लोकांना हे दारिद्र्य भोगावं लागणार? श्रीमंत-गरीब हा भेद कधी संपणार? कष्टकरी गरीबांना त्यांचे हक्क कधी मिळणार?



मास्टर्स पदवी घेतल्यावर फैझ अमृतसरच्या एमएओ कॉलेजमध्ये शिकवू लागले. त्यांना शिकवण्यात रस वाटू लागला. विद्यार्थ्यांशी त्यांचे नाते मैत्रीपूर्ण होते. कॉलेजचे उपप्राचार्य मेहमूद-उझ-झफर आणि त्यांची पत्नी डॉक्टर रशीद जहाँ यांचा फैझवर खूप प्रभाव पडला. त्या दोघांनी स्वतःला लोककल्याणाकरिता वाहून घेतले होते. एमएओ कॉलेजमध्ये प्रोफेसर मोहम्मद दीन तासीर हे फैझचे सहकारी शिक्षक होते.
फैझ शायरी लिखाणात जास्त रस घेऊ लागलं. अमृतसरमध्ये असताना, तं राजकारणाकडे ओढले गेले आणि सिव्हिल लिबर्टिज असोसिएशनचे सदस्य बनले. ते प्रोग्रेसिव्ह रायटर्स मुव्हमेंटमध्येही भाग घेऊ लागले. अमृतसरमध्येच फैझची भेट ॲलीसशी झाली.
मी फैझ. मी डॉ. तासीर यांच्या एमएओ कॉलेजमध्ये शिकवतो. तुम्हाला भेटून आनंद झाला.
मलाही तुम्हाला भेटून आनंद झाला. मी ॲलीस, मिसेस तासीरची धाकटी बहीण. मी माझी बहीण ख्रिस्तोबल तासीरसोबत सुट्टी घालवण्यासाठी इंग्लंडहून इथे आलेय.
फैझ, तिच्या लहान वयावर जाऊ नका. ती कट्टर मार्क्सिस्ट आहे. खरंतर, ती बुद्धिजीवी आहे. तिला संगीत, चित्रकला, नाटक या सगळ्यात रस आहे.


बागेतील ते फूल सर्वात सुंदर
पानगळीच्या वाऱ्याची ना त्याला खबर
वसंतातील ते सर्वात प्रिय फूल
ज्याची प्रत्येकाला पडते भूल
डॉक्टर तासीर यांची श्रीनगरला बदली झाली. यादरम्यान, फैझ आणि ॲलीस यांच्यात प्रेम जुळले आणि त्यांनी लग्न करायचे ठरवले. हे लग्न काश्मीरच्या महाराजांच्या उन्हाळी राजवाड्यात संपन्न झाले. या निकाहाचे विधी *शेख अब्दुल्ला* यांनी पूर्ण केले.


दुसरे महायुद्ध सुरू झाले. बऱ्याचशा भारतीयांनी ब्रिटन आणि फ्रान्सला पाठिंबा दिला. कारण जर्मनी आणि इटली या देशांच्या वंशश्रेष्ठत्वाचा सिद्धांत लोकांना अमान्य होता. 1942 साली, फैझ ब्रिटीश सेन्यात दाखल झाले. त्यांनी चार वर्षे सैन्यात सेवा दिली. 1947 साली पाकिस्तानची निर्मिती झाल्यावर फैझ आणि ॲलीस पाकिस्तानात गेले. तिथे फैझ *पाकिस्तान टाइम्स* वृत्तपत्राचे संपादक बनले.








पण आपल्या स्वप्नातील पाकिस्तान प्रत्यक्षात उतरला नाही, हे पाहून फैझने शासनावर टीकात्मक लेख लिहीले. यामुळे बिथरलेल्या सरकारने 1951 साली फैझ यांना रावळपिंडी कट प्रकरणात गोवून अटक केली.
जी गोष्ट कधी अस्तित्वातच नव्हती तीच त्यांना सर्वाधिक खटकली.


फैझ, तुमचं *दस्त-ए-सबा* छापून आलं. अभिनंदन! काही वर्षांनी लोक रावळपिंडी कट प्रकरण विसरतील. तुमच्या या पुस्तकाचं प्रकाशन हीच 1952 मधील अतिशय महत्त्वाची ऐतिहासिक घटना ठरेल.
बन्ने भाई, (*सज्जाद झहीर*) तुम्ही अतिशयोक्ती करताय.
फैझ साहेब, आपली कविता *सुबह-ए-आजादी* यांतील काही ओळी गुणगुणा ना.


काळोख उजेडाला गुदमरवून टाकतो
आणि रात्रीचा अंत काही दिसत नाही
हीच का ती सकाळ,
जिची वाट बघत होतो आपण, केव्हापासून?
नाही, ही ती सकाळ नाही
जिची आपण कामना केली होती आणि
तिचा आपण शोध घेत होतो
या अपेक्षेने की शेवटच्या ताऱ्यानंतर
रात्रीचा अंत होईल, कुठेतरी.
ही रात्र एका मृत समुद्रासारखी आहे
तरीही याचा किनारा असेल, कुठेतरी....



या क्षणी, माझ्या प्रिये,
तुझ्या स्मृती माझ्या दुःखी मनाला
कुरवाळतायत हळुवार
असं वाटतं, संपलेत सारे
विरहाचे दिवस आणि
एका कोमल रात्री
मी तुला कवेत घेतलंय.


POLICE STATION
LYALLPUR
लयालपूर
पोलीस
स्टेशन
ते बघ, अब्बा आले.
S.P. POLICE PUNJAB
PAKISTAN
प्रसन्न दिसतायत ते.


ॲलीस आणि मुली तुरुंगातील फैझची भेट घेत असत.
तू ठीक आहेस, हे पाहून खूप बरं वाटलं. तुला बघेपर्यंत माझ्या जीवात जीव नसतो.


बरं *मिझ्रू*, तुझ्या आठव्या वाढदिवसाला तुला काय भेटवस्तू पाहिजे?
मला बाहुली पाहिजे. सोनेरी केसांची, बोलकी!


फैझ यांना हैद्राबाद, लयालपूर (फैसलाबाद), सरगोधा, माँटगोमेरी (साहीवाल) आणि लाहोर येथील तुरुंगांमध्ये ठेवण्यात आले. त्यांचे थोरले भाऊ *तुफैल अहमद* हैद्राबाद तुरुंगात येऊन त्यांना भेटले. त्यानंतर लगेच तुफैल यांचा मृत्यू झाला. फैझला खूप दु:ख झाले. बराच काळ ते नैराश्यावस्थेत होते. चार वर्षांच्या तुरुंगवासानंतर, 2 एप्रिल 1955 रोजी त्यांची सुटका झाली.
خوش آمدید
جناب فیض احمد فیض
चीमी, मिझू. आणखी किती वेळ जागत राहाणार? फैझला पोहोचायला किती वेळ लागेल माहीत नाही.
आपले अब्बा परतणार म्हणून त्या एवढ्या खुश आहेत की त्या झोपू शकणार नाहीत.
खरंच आजी, आम्ही झोपूच शकणार नाही.




फैझ, मला तुझी *शाम-ए-फिराक* ही कविता ऐकावीशी वाटतेय.
फैझ पुन्हा *पाकिस्तान टाइम्स*मध्ये रुजू झाले. काही काळ त्यांनी *लैल-ओ-नहर* हे मासिक संपादीत केले. 1958 साली *अयुब खान* यांनी पाकिस्तानमध्ये मार्शल लॉ लागू केला, तेव्हा फैझ यांना पुन्हा अटक झाली. एप्रिल 1959 मध्ये त्यांची सुटका झाली.



1953 साली दोन महिन्यांसाठी मी कराचीच्या जिना हॉस्पीटलमध्ये होतो, तेव्हा ही कविता लिहिली होती. आठवतंय? मग ऐका....
नका स्मरण देऊ अमर्याद त्या दुःखाची. ते आलं ते गेलं
तरीही हृदय धडधडतंय अजून, आणि जीव शाबूत आहे.
तुझं सौंदर्य माझ्या विचारांना उजळतात. मी एकाकी नाही आता
तुझा विचार करू लागताच, माझी सकाळ सुगंधी होते
तुझ्यासाठी झुरू लागताच, माझी रात्र वेडीपिशी होते
तुला काय सांगायचं ते मनात स्पष्ट होतं
पण तू समोर आलीस अन माझ्या शब्दांचे अर्थच बदलून गेले
रात्रीचे ते माझे सखेसोबती प्रवासी आता कुठे आहेत?
सकाळच्या त्या झुळुकांनी मला केव्हा वाळीत टाकलं
सकाळ केव्हा माझ्या जवळून निघून गेली?



देशामध्ये ललित कला समृद्ध व्हाव्यात, अशी फैझची इच्छा होती. ते लाहोरच्या *अल्हामरा कला मंडळात* काम करू लागले. संगीत, चित्रकला, नृत्य, चित्रपट आणि नाटक या कला जीवन संपन्न करतात. ॲलीसलाही ललित कलांमध्ये रस होता. तिने लाहोरमध्ये एक कठपुतली थिएटर सुरू केले. फैझ या थिएटरसाठी नाटके लिहू लागलं आणि त्याच्या मुली, *सलिमा* आणि *मोनिझा,* त्यात काम करू लागल्या.






एक चांगली बातमी आहे. सोव्हियेत युनियन मला *लेनिन शांतता पुरस्कार* देऊ इच्छिते. त्यांनी मला मॉस्कोला येण्याचं निमंत्रण दिलंय. पण आपलं सरकार मला जाण्याची परवानगी देईल का, शंका वाटते.
मला वाटतं, असा सन्मान मिळणारा तू पहिला आशियाई आहेस. सरकार तुझी पर्वा करत नसले तरी पाकिस्तानचे लोक, खरंतर, साऱ्या जगातील लोक तुझ्यावर प्रेम करतात.


अध्यक्षीय समितीचे माननीय सदस्य, सभ्य स्त्री आणि पुरुषहो! शब्दांशी खेळणं आणि कथा-काव्य लिहीणं, हे कवी आणि लेखकांचं कामच असतं. पण हा सन्मान प्रदान केल्याबद्दल लेनिन पुरस्कार समितीचे आभार मानण्यासाठी मला शब्दच सुचत नाहीयेत.
....मानवाची बुद्धिमत्ता, विज्ञान आणि उद्योग यांच्या संयोगाने असंख्य सोयीसुविधा मिळून आपलं आयुष्य सुलभ झालंय. पण निसर्गाच्या अमर्याद साधनसंपत्तीवर काही हव्यासी लोक आपला हक्क प्रस्थापित करू पाहातायत. खरंतर, निसर्गाचं देणं समस्त मानवजातीच्या कल्याणासाठी उपयोगात यायला हवं. हे तेव्हाच शक्य आहे, जेव्हा मानवी समाज लोभ, शोषण आणि मालकी हक्क यांच्याऐवजी न्याय, समता, स्वातंत्र्य आणि प्रत्येक मानवाचं कल्याण या मूल्यांचा कसोशीने अंगीकार करेल.
माझा दृढ विश्वास आहे की शेवटी मानवतेचा विजय अटळ आहे. कारण तिने आपल्या शत्रुंसमोर कधीच हार पत्करली नाही. त्यामुळे विश्वात युद्ध, तिरस्कार आणि क्रूरता यांऐवजी प्रेम आणि बंधुता यांचं राज्य असेल.

फैझ अहमद फैझ यांनी कितीतरी पटकथा, कथा, कविता आणि गझल लिहिल्या. 1959 सालचा *ए.जे.कारदार* दिग्दर्शित चित्रपट *जागो हुआ सवेरा* याची पटकथा फैझ यांनीच लिहिली होती. पूर्व पाकिस्तानमध्ये बनलेला हा पहिलाच उर्दू भाषिक चित्रपट होता. सोव्हियेत युनियनच्या पहिल्याच चित्रपट महोत्सवात *जागो हुआ सवेरा* हा चित्रपट सुवर्णपदकाचा मानकरी ठरला. 1975 साली, पाकिस्तान सरकारने चित्रपट कलेला प्रोत्साहन देण्यासाठी एका संस्थेची स्थापनी केली. त्याअंतर्गत ए.जे. कारदार यांनी एक चित्रपट बनवला, *ऑफ ह्युमन हॅपीनेस*. या चित्रपटाचे उर्दू नाव होते, *दूर है सुख का गाँव.*





हलेजीमध्ये आपला सेट लावण्याआधी आपण काही अत्यंत महत्त्वाचे शॉट घेण्याबाबत चर्चा करूया.
अगदी योग्य!
जशी वाळवंटातली झुळूक ऐन वसंतात
जशी आजाऱ्याची शमली वेदना अकस्मात


पाकिस्तानच्या पहिल्या लोकशाही सरकारने फैझ यांना पाकिस्तान नॅशनल
काऊन्सिल ऑफ द आर्ट्स या महत्त्वाच्या संस्थेचा अध्यक्ष बनवले. ॲलीस
पाकिस्तानी हस्तकलेच्या विकासासाठी काम करू लागली. फैझने चीन,
व्हिएतनाम आणि कंबोडिया या देशांचे दौरे केले. बांग्लादेशची निर्मिती
झाल्यावर, ते पंतप्रधान झुल्फिकार अली भुट्टो यांच्यासोबत ढाक्याला
गेले. काही वर्षांनी, फैझ कराचीला गेले. तिथे त्यांना ल्यारी येथील
अब्दुल्ला हरून कॉलेजचे प्रिन्सिपल बनवण्यात आले. हे कॉलेज गरीब
विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी काम करत होते. 5 जुलै 1977 रोजी, भुत्तो
यांच्या शासनाचा अंत करून जनरल झिया यांनी मार्शल लॉ लागू केला.
1978 साली, फैझने युद्धग्रस्त बैरूत देशाचा दौरा केला. तिथे फैझच्या
काव्याचे समर्थक आणि प्रशंसक यासर अराफत राहात असत.
बैरूतमध्ये किती फिलीस्तिनी आश्रित राहातात? यासर अराफत, मी दुवा करतो की तुमच्या स्वातंत्र्य चळवळीला लवकरच यश मिळो.

जनरल झिया-उल्-हक यांच्या मार्शल लॉ काळात कित्येक साहित्यिक, पत्रकार आणि तत्वज्ञ यांना नव्या सरकारचा रोष सहन करावा लागला. 1971 साली, फैझ *पाकिस्तान नॅशनल काऊन्सिल ऑफ आर्ट्स*चे प्रमुख बनले. 1973 साली, ते सरकारचा सांस्कृतिक सल्लागार म्हणून काम पाहू लागले. मार्शल लॉ लागू झाल्यावर फैझने राजीनामा दिला. 1978 साली, ते बैरूत येथे राहात असताना, त्यांचा चित्रपट *दूर है सुख का गाँव* याच्या संकलनाचे काम सुरू होते. पण हा चित्रपट कधी पडद्यावर आलाच नाही. त्याच्या रिळांचे काय झाले, याचाही कुणाला पत्ता नाही. या गोष्टीचे फैझला फार दु:ख झाले. बैरूतमध्ये फैझ *लोटस* या आशियाई-आफ्रिकी साहित्य पत्रिकेच्या संपादनाचे काम करू लागले.





(कवितांच्या ओळी इंग्रजीतून अनुवादीत केल्या आहेत)